# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

(महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५)च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालीत राज्य विद्यापीठ)

**(क्रिडा व शारिरिक शिक्षण विभाग)**

एम.आय.डि.सी. रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली – ४४२६०५

जावक क्रमांक/गो.वि.ग./क्रि.शा.शि.वि./ 186 /२०२२ दिनांक : २३/०२/२०२२

## शिक्षकेत्तर कर्मचारी
## "अमृत क्रिडा व कला महोत्सव - २०२२"
## दोन दिवसीय क्रिडा व कला प्रकारातील खेळ व सांस्कृतीक कार्यक्रमाबाबत नियमावली

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयांचे प्राचार्य, महाविद्यालयांचे व विद्यापीठांचे शिक्षकेत्तर कर्मचारी यांना याव्दारे कळविण्यात येते की, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांमधील कला-गुणांना वाव देवून त्यांच्यामध्ये खेळांप्रती उत्साह निर्माण व्हावा याकरीता गोंडवाना विद्यापीठाव्दारे विद्यापीठातील शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच संलग्नीत अनुदानीत महाविद्यालयांतील नियमीत शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्याकरीता दिनांक २६ व २७ फेब्रुवारी २०२२ रोजी दोन दिवसीय **"अमृत क्रिडा व कला महोत्सव २०२२"** चे आयोजन करण्यात आलेले आहे.

दोन दिवसीय "अमृत क्रिडा व कला महोत्सव २०२२" करीता असलेल्या मर्यादीत वेळेत विविध क्रिडा व कला प्रकारांचे उत्तम नियोजन व यशस्वी कार्यक्रम होण्याकरीता सर्व सहभागी कर्मचारी/खेळाडू/स्पर्धक यांचेकरीता खालीलप्रमाणे सर्वसाधारण नियम, अटि व शर्ती लागु राहतील याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**१) व्हॉलिबॉल -**

१) व्हॉलिबॉलचा सामना १५ पॉईंटचा व ३ सेट मध्ये खेळवल्या जाईल.
२) सेमी फायनल व फायनल सामना २५ पॉईंटचा व ३ सेटमध्ये खेवळला जाईल.

**२) कबड्डी -**

१) कबड्डीचा प्रत्येक सामना हा १० मिनीटे कालावधीचा राहिल.
२) कबड्डीचे सामने मॅटवर खेळवल्या जातील.
३) कबड्डीचे सामने मॅटवर खेळण्याकरीता आवश्यक असलेल्या साहित्यांची व्यवस्था खेळाडूंनी स्वता करावी.

**३) दौड स्पर्धा -**

१) दौड स्पर्धा केवळ पुरूष धावपटूंकरीताच असेल.
२) सहभागी स्पर्धकांची संख्या लक्षात घेता गटनिहाय एका वेळी सोडण्यात येईल व प्रत्येक गटातून प्रथम येणाऱ्या सर्व धावपटूंना अंतीम राऊंडमध्ये प्रवेश दिल्या जाईल.
३) दौड स्पर्धा ही १०० मिटरचीच असेल.

**४) फास्ट वॉकींग स्पर्धा -**

१) फास्ट वॉकींग स्पर्धा केवळ महिला धावपटूंकरीताच असेल.
२) सहभागी स्पर्धकांची संख्या लक्षात घेता गटनिहाय एका वेळी सोडण्यात येईल व प्रत्येक गटातून प्रथम येणाऱ्या सर्व धावपटूंना अंतीम राऊंडमध्ये प्रवेश दिल्या जाईल.
३) फास्ट वॉकींग स्पर्धा ही ४०० मिटरचीच असेल.

**५) कॅरम -**

१) सहभागींची संख्या लक्षात घेता सुरूवातीचे प्रत्येक सामने १५ पॉईंटचेच खेळवल्या जातील.
२) अंतिम सामना हा २९ पॉईंचा खेळवला जाईल.

**६) बुद्धीबळ (म. व पु.)-**

१) बुद्धीबळ खेळाचे नियम संघ व्यवस्थापकांच्या सभेमध्ये ठरविण्यात येईल. व त्यांचे नियम सर्व खेळाडूंना बंधनकारक राहतील.

२) बुद्धीबळ खेळाचे बोर्ड (Chess Board) स्पर्धकांनी स्वताचे घेवून यावे.

**७) चमचा गोळी (म.) -**

१) चमचा गोळी हा खेळ केवळ महिलांकरीताच असेल.

२) आयोजकांव्दारे पुरविण्यात येणाऱ्या चमचा व गोळीचा वापर करूनच खेळ खेळल्या जाईल.

**८) संगीत खुर्ची (महिला) -**

१) स्पर्धा प्रमुखांच्या सुचना व निर्देशान्वये सदर खेळ संचालीत होईल.

**९) बॅडमिंटन सिंगल (महिला) -**

१) बॅडमिंटनचा सामना २१ पॉईंटचा व ३ सेट मध्ये खेळवल्या जाईल.

**कला प्रकार (सांस्कृतिक कार्यक्रम) -**

**१) समूह गीत गायन -**

१) समूह गीत गायनामध्ये धृवपद आणि दोनच अंतरे गाता येईल.

२) समूह गीत गायनामध्ये कमीत कमी ४ व जास्तीत जास्त ८ स्पर्धकांचा समावेश असावा.

३) समूह गीत ट्रॅक वर गाता येणार नाही.

४) समूह गीत तबला, हार्मोनियम व इतर वाद्यांच्या साथ संगतीने गायचे आहे.

५) आयोजकांतर्फे वाद्य व वादकांची व्यवस्था केलेली आहे.

**२) एकल गीत गायन -**

१) एकल गीत गायनामध्ये धृवपद आणि दोनच अंतरे गाता येईल.

२) एकलगीत ट्रॅक वर गाता येणार नाही.

३) एकलगीत तबला, हार्मोनियम व इतर वाद्यांच्या साथ संगतीने गायचे आहे.

४) आयोजकांतर्फे वाद्य व वादकांची व्यवस्था केलेली आहे.

**३) समुह नृत्य -**

१) नृत्याच्या गीतामध्ये धृवपद व दोन अतंऱ्यांचाच समावेश असावा.

२) समूह नृत्यामध्ये कमीत कमी ५ व जास्तीत जास्त १० स्पर्धकांचा (म. व पु.) समावेश असावा.

३) स्पर्धकांनी स्वताच्या नृत्याच्या गीताची एकच गीत असलेली सिडी/पेन ड्राईव्ह तयार करून सोबत आणावे.

**४) नाटिका-**

१) नाटिकेच्या सादरीकरणाकरीता स्पर्धकांना केवळ १० मिनीटांचा वेळ देण्यात येईल.

२) सादरीकरणामध्ये कोणत्याही राजकीय नेत्याचा किंवा पक्षाचा उल्लेख नसावा.

३) स्पर्धकाने स्पर्धेच्या वेळेत वेळेवर उपस्थित राहावे.

**५) मिमिक्रि -**

१) सादरीकरणामध्ये कोणत्याही राजकीय नेत्याचा किंवा पक्षाचा उल्लेख नसावा.

२) स्पर्धकाने स्पर्धेच्या वेळेत वेळेवर उपस्थित राहावे.

**सर्वसाधारण नियम -**

१) क्रिडा प्रकारातील रस्साखेच या प्रकारामध्ये सहभागींचा प्रमाण अत्यल्प असल्यामुळे रद्द करण्यात आलेले आहे, याची नोंद घ्यावी.

२) कला प्रकारातील सांस्कृतीक कार्यक्रमांना पुरेसा कालावधी नसल्यामुळे एकल नृत्य प्रकार रद्द करण्यात आलेला आहे याची नोंद घ्यावी.

३) ठरावीक वेळेत उपस्थित राहणे बंधकारक राहिल, अनुपस्थित राहील्यास संघ बाद ठरविण्यात येईल.

GONDWANA UNIVERSITY (M.S.) PHYSICAL EDUC DEPARTMENT GADCHIROLI

४) प्रत्येक स्पर्धा ही त्या-त्या स्पर्धा प्रमुखांच्या निर्देश व सुचनेच्या अनुषंगाने संचालीत होईल.

५) प्रत्येक संघातील विद्यापीठीय/महाविद्यालयीन कर्मचारी यांनी खेळाच्या ठिकाणी आपले ओळखपत्र सोबत घेऊन यावे, नियमानुसार नियमीत शिक्षकेत्तर कर्मचारी यांनाच संघात स्थान राहील, नियमांचे उल्लंखन केल्यास संघास बाद ठरविण्यात येईल.

६) पंचाचा निर्णय अंतिम राहील.

७) प्रत्येक कर्मचारी यांनी खेळतांना खेळ भावनेतुन खेळावे.

८) खेळाच्या मैदानावर नशा/धुम्रपान करण्यास सक्त मनाई असेल, तसेच प्रशासकीय कार्यवाहीस प्राप्त असेल.

९) खेळतांना इजा होणार नाही याची दक्षता घ्यावी, इजा झाल्यास स्वत: जबाबदार राहील.

१०) उद्घाटनाच्या १ तासापुर्वी उपस्थित खेळाडू व स्पर्धकांनी नोंदणी करणे बंधनकारक राहिल.

११) खेळाडू / स्पर्धकांना कोणत्याही प्रकारचा प्रवासखर्च देय राहणार नाही.

१२) संघ / खेळाडू / स्पर्धक यांची कोणत्याही स्पर्धेच्या १० मिनीटापुर्वी उपस्थिती आवश्यक राहिल अन्यथा अनुपस्थित ठरवून पुढील क्रंमाकाला विचारात घेतल्या जाईल, याची नोंद घ्यावी.

१३) अमृत क्रिडा व कला महोत्सवामध्ये सहभागी प्रत्येक महाविद्यालयाने स्वत:चा ध्वज सोबत घेवून यावे.

(स्वाक्षरी) २५/०४/२०२२

(डॉ. अनिता लोखंडे)
संचालक
क्रिडा व शारिरीक शिक्षण विभाग

Department of Sports & Physical Education Gondwana University Gadchiroli

GONDWANA UNIVERSITY PHYSICAL EDUC. DEPARTMENT GADCHIROLI (M.S.)

**प्रतिलीपी माहितीस्तव व कार्यवाहीस्तव -**

१) मा. कुलगुरू महोदय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

२) मा. प्र-कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

३) मा. कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

४) सर्व समिती प्रमुख, अमृत क्रीडा व कला महोत्सव